SHIVAJI COLLEGE HINGOLI



MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

April To June 2019
Issue-30, Vol-01

Date of Publication
02 April 2019

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: Harshwardhan Publication Pvt.Ltd. Published by Ghodke Archana Rajendra & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor Dr. Gholap Bapu Ganpat.

Reg.No.U74120 MH2013 PTC 2512
Harshwardhan Publication Pvt.L
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors

T.C
Assistant Professor
Shivaji College
Tq.& Dist.Hingoli.(M.S.)

71

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •



13) पर्यावरणीय नीतिशास्त्र : एक चिकित्सा
प्रा. डॉ. भुसारे सुनंदा रामचंद्र, हिंगोली ||55

14) गांधीजींचे स्त्री उत्थानासंबंधी विचार आणि कार्य
डॉ. देवयानी चव्हाण,नागपूर ||58

15) भाई कोतवाल यांचा क्रांतिकारी लढा
डॉ. प्रभाकर गणपत गावंड,रायगड ||61

16) मानवाधिकार यश आणि अपयश
प्रा. डॉ. सायबण्णा घोडके, मुरूम ||66

17) संत तुकारामाचे शेती विषयक विचार
प्रा. डॉ. नवीन के. गिलबिले, हिंगोल ||68

18) भारतीय संविधान आणि स्त्री
प्रा. डॉ. कालिदास गुडदे , परभणी ||71

19) रामोशी समाजातले थोर क्रांतिकारक उमाजी नाईक
प्रा.डॉ. कदम एस.आर. ,बीड ||74

20) म.ज्योतीबा फूले यांचे शैक्षणीक योगदान
प्रा. विष्णु जगन पवार, पुलगांव || 77

21) न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे : थोर सुधारक
डॉ.रूद्राक्षे चंद्रकांत दशरथ,लोणी ||79

22) युद्ध बन्दी एवं बन्दीकर्ता राज्य के अधिकार : एक अध्ययन
श्रद्धा सोम सिंह, ग्वालियर (म.प्र.) ||82

23) एकोणिसावे शतक आणि महाराष्ट्रातील दलित चळवळ : एक आकलन
डॉ.एस.डी. सावंत,लातूर ||85

24) साहित्य और सिनेमा
नसीम बानो अन्सारी ||91

25) गुरबानी संगीत में वाद्य—यंत्रों का योगदान तथा महत्व
डॉ. पूर्वी लुनियाल, सिरमौर (हि.प्र.) ||96

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



T.C

Lecturer
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS.)

Scanned with OKEN Scanner

SHIVAJI COLLEGE HINGOLI



स्वयंशिक्षण देण्याचे ग्रंथालय हे केंद्र आहे. ग्रंथालयामध्ये साक्षरता वर्गाचे आयोजन करणे आणि नवसाक्षरांची वाचनक्षमता वाढवणे यासारखे उपक्रम रावविले जाऊन देशाच्या साक्षरता प्रसाराला हातभार लावला जातो.

८. स्त्रीसक्षमीकरण □समाजामध्ये सामाजिक बंधनाने जखडलेल्या स्त्रियांना देखील ग्रंथालय हे एक वरदानच ठरते. वाचनामुळे त्यांच्यामध्ये वैचारिक सामर्थ्य निर्माण होते. त्याचबरोबर त्या वैयक्तिक कुटुंबसंस्था विकसित करण्याचा प्रयत्न करतात. परिणामी समाज परिवर्तन होऊ शकते म्हणजे अप्रत्यक्षपणे समाज सुधारणेचे कार्य या ग्रंथालयांमुळे होते.

९. शेतीविषयक मार्गदर्शन □आपला भारत देश हा कृषीप्रधान देश आहे. बहुसंख्य लोक शेतीवर अवलंबून आहेत. सध्याची परिस्थिती लक्षात घेतली तर आधुनिक तंत्रज्ञानाने शेती करणे ही काळाची गरज आहे. त्यासाठीचे आवश्यक ज्ञान या ग्रंथालयाद्वारा मिळू शकते. कृषी व्यवसायास आवश्यक तसेच अनेक पूरक व्यवसायाचे ज्ञान आपल्याला ग्रंथालयीन साहित्यातून मिळते. शेती क्षेत्रातील विविध योजना व ताज्या घडामोडी ग्रंथालयामध्ये माहिती होवू शकतात.

समारोप □अशाप्रकारे सार्वजनिक ग्रंथालये ही समाजाचा एक अविभाज्य घटक आहेत. सार्वजनिक ग्रंथालय म्हणजे सर्वसामान्यांचे मनोरंजन करणारे किंवा माहितीपूर्ण साहित्य उपलब्ध करणारे कथा कादंबरी नाटक प्रवासवर्णने चरित्र विज्ञान कविता अध्यात्म अशा जीवनाला सर्वबाजूने सार्थ करणाऱ्या विषयांची दालने असलेले स्थान होय. समाजाला ग्रंथालयांची गरज आहे.

संदर्भ □

१. जोशी, पं. महादेवशास्त्री (संपा) □भारतीय संस्कृतीकोश□खंड ३ भारतीय संस्कृतीकोश मंडळ पुणे प्रथम आवृत्ती १९६५

२. प्रा. पाटील, सी. श्री, विश्व महाराष्ट्रातील सार्व जनिक ग्रंथालयांचे स्नेहल एजन्सीज, देवगड २००५

३. नरगुंदे रेवती, □ग्रंथलेखन आणि माहितीशास्त्र□ युनिव्हर्सल प्रकाशन पुणे, १९९६

४. नरगुंदे रेवती, □ग्रंथालय आणि सामाजिक विकास□ युनिव्हर्सल प्रकाशन पुणे, २०१३

५. यादव आनंद, □ग्रंथालय व समाज□य. च. म. मुक्त विद्यापीठ नासिक ,१९९५

६. देशपांडे ए. व्ही. □ग्रंथालयांचे विविध प्रकार व त्यांची कार्ये□य. च. म. मुक्त विद्यापीठ नासिक ,१९०७

13

# पर्यावरणीय नीतिशास्त्र : एक चिकित्सा

प्रा. डॉ. भुसारे सुनंदा रामचंद्र
तत्वज्ञान विभाग
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

**********

पर्यावरणाचा विचार करत असतांना पर्यावरणीय नीतिशास्त्र लक्षात घेणे आवश्यक आहे. त्या आधी "नीतिशास्त्र म्हणजे आचरणावर दिले जाणारे नीति-निर्णय" अशी थोडक्यात नीतिशास्त्राची व्याख्या आपल्याला करता येईल. तसेच पर्यावरण म्हणजे आपल्या सभोवतालचा परिसर होय. नीतिशास्त्राच्या दृष्टिकोनातून पर्यावरणाचा विचार करणे म्हणजे पर्यावरणाच नीतिशास्त्र होय. मानव समाजाने किंवा मानवाने जेव्हा बुध्दीचा वापर सुरु केला. समाजशिलता धारण केली तेव्हा नीतिशास्त्राचा जन्म झाला. मानवी समाजाच्या सुव्यवस्थेसाठी मानवानेच समाजातील इतर मानवांना नियम घालवून दिले. हेच नियम पुढे रुढी, परंपरा बनले त्यांचे पालन करत करत मानवी समाजाचा विकास होत गेला.

पण विकास म्हणजे तरी काय ? तर हेच की, जे नियम अगोदर सुव्यवस्थेसाठी तयार केले तेच नियम जेव्हा जेव्हा त्याला कालबाह्य झाले असे वाटले. तेव्हा तेव्हा त्याने मोडीत काढले आणि नव्या नियमांच्या मदतीने मानव समाजाचा त्याने पुढील विकास घडवून आणला, मानवी समाजात सुव्यवस्थितपणा येणे, सुसंस्कृतपणा येणे म्हणजे तरी काय ? तर या सृष्टीतील, पर्यावरणातील पर्याप्त साधन सामुग्रीचा उपयोग करुन त्याने स्वतःला सुसंस्कृत बनविण्याचा सतत प्रयत्न केला. कारण त्याने विकास करण्यासाठी सतत निसर्गा चे मार्गदर्शन, सहाय्य घेतले आहे. निसर्गातीलच घटकांची मदत घेवून त्याने स्वतःची प्रगती केली. म्हणून मानव अनेकदा निसर्गाला आपला गुरु मानतो. निसर्गाच्या सानिध्यात राहून अनेकदा त्याने निसर्गाचे अनुकरण केले. निसर्गातील वेगवेगळ्या घटनांचा अर्थ लावण्याचा त्याने प्रयत्न केला. निसर्ग हा परिपूर्ण असतो. त्यात घडून गेलेल्या, घडणाऱ्या घटनांना आपवाद नसतो. निसर्गाचे नियम हे सर्वांसाठी सारखेच असते. त्यामध्ये कधीच बदल होत नाही. निसर्गामध्ये



T.C
Lecturer
Shivaji College,Hingoli
Ta.& Dist.Hingoli (MS.)



Scanned with OKEN Scanner

SHIVAJI COLLEGE HINGOLI



असलेल्या अमोघ अशा साधन सामुग्रीचा पुरेपुर उपभोग घेण्यास त्याने सुरुवात केली. स्वतःच्या विकासापोटी त्याने सुरुवातीपासूनच निसर्गाला हाणी पोहचविण्यास सुरुवात केली, हवा, पाणी, खनीजसंपत्ती, झाडे, वेली, पशू-पक्षी, वन्यप्राणी, ऊन आणि अशा असंख्य गोष्टी त्याने निसर्गातून घेतल्या. निसर्गाच्या साधन सामुग्रीचा उपयोग करुन त्याने सुरुवाती पासून स्वतः ची प्रगती केली. हे सर्व करत असतांना मानवाने एक गोष्ट निर्माण केली ती म्हणजे त्याने प्रदूषण निर्माण केले. हे प्रदूषण त्याने कसे केले हे पाहूणे आवश्यक आहे.

प्रदूषण म्हणजे भोवतालच्या वातावरणात अस्वच्छता निर्माण करणे होय." उदा. आपण सभोवतालच्या पर्यावरणचा उपभोग घ्यायचा आणि नंतर त्याची स्वच्छता करावयाची नाही. निसर्गाची झालेली हानी भरुन काढायची नाही. ती हानी मानव वेगवेगळ्या स्वरुपात करत आला आहे. "मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी निसर्ग आणि साधन संपत्तीचे अतिरिक्त शोषण केले. मांस, कातडी, हाडांसाठी, पशुंची निर्घृण हत्या सुरु केली. अवैध वृक्षतोड, खनिज संपत्तीच्या लालसेने जमीनीवर आघात सुरु केले. प्रयोगशाळेत प्रयोगांसाठी प्राण्यांचे बळी घेतले जाऊ लागले. औद्योगिक क्षेत्राच्या माध्यमातून वायु व जल प्रदूषणात वाढ केली. त्यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडले."१ वर सांगितल्या प्रमाणे मानवाने निसर्गाच्या सानिध्यात राहून निसर्गालाच झळ पोहचवली ती कशा प्रकारे ते आपण पुढील प्रमाणे पाहू.

मानवाने बुध्दीचा वापर सुरु केल्या नंतर त्याने सर्वात अगोदर वृक्षतोड करुन स्वतःला राहण्यायोग्य जंगल विरहीत ज़मीन तयार केली. म्हणजेच वृक्ष तोड केली. तेव्हा पासून मानवाने पृथ्वीवर प्रदूषण करण्यास सुरुवात केली. असंख्य प्रकारचे शोध आणि संशोधने केली त्याचे सकारात्मक परिणाम त्याला उपभोगायला भेटत असले तरी निसर्गाची मात्र हानी होतच राहिली. पूर्वीच्या काळात नैसर्गिक साधन सामुग्री मुबलक प्रमाणात असल्यामुळे मानवाला त्या नैसर्गिक साधन संपत्तीची नासधुस करतांना त्याची काळजी घ्यावी लागले असे कधीच वाटले नाही. तो आपल्या नैतिक जवाबदारी पासुन कायम दूर राहिला. निसर्गातील धनसंपदेची नासधुस करतांना त्याला त्याच्या स्वतःच्या भविष्याची कधीच काळजी वाटली नाही.

निसर्गाच्या सान्निध्यात राहून मानवाने निसर्गाकडून भरभरुन शिकून घेतले पण तो तेवढ्यावरच थांबला नाही. तर त्याने निसर्गावर अतिक्रमण केले. निसर्गावर कुरघोडी केली. निसर्गाला पूर्णप्रमाणात नाही पण काही प्रमाणात आपल्या काबुत करुन घेण्याचा त्याने सतत प्रयत्न चालविला आहे. त्याचे अनेक प्रकार आपल्याला पहायला मिळतील. त्यामध्ये वर उल्लेखिल्या प्रमाणे वृक्षतोड करुन जंगले उध्वस्त केली. त्या जागेवर इमारती रुपी सिमेंटची जंगले उभी केली. परिणामी पाऊस गायब झाला. दरवर्षी दुष्काळाला तोंड द्यावे लागत आहे. हे सर्व मानवाने स्वतःच्या विकासासाठी केले. मानव विकास होणेही आवश्यक असले तरी पर्यावरणाची हानी होणे ही योग्य नाही. त्यासाठी मानवाने स्वतःमागे डोकावून बघणे आवश्यक आहे.

मानवाने संस्कृती निर्माण केले. त्याद्वारे त्याने स्वतःमध्ये सुसंस्कृतपणा आणण्याचा प्रयत्न केला. पण तो जेव्हा पासुन स्वतःला सुसंस्कृत मानू लागतो तेव्हा पासून तो खऱ्या अर्थाने असंस्कृतपणा सुरुवात करतो. निसर्गाने मानवाची निर्मिती केली. नव्हे त्याला समनस्क बनविले. थोडक्यात समनस्क म्हणजे काय तर मन हे इंद्रिय असलेले प्राणी होय. इतर प्राण्या पासुन वेगळा प्राणी म्हणजे माणूस जो निसर्गाची अती उत्कृष्ट अशी निर्मिती आहे. म्हणून त्यांच्याकडून अपेक्षा करणे रास्त आहे की त्याने पर्यावरण संवर्धन करावे. पण माणूस हा स्वार्थी आहे आणि जेवढा तो सुशिक्षित होईल तेवढा तो जास्त स्वार्थी होत जातो. त्याने नैसर्गिक साधन सामुग्रीची नासधुस मांडली. मोडतोड केली, काही प्रमाणात निसर्गावर विजयही मिळविला. पण त्यासाठी त्याने निसर्गारचनेतही अनेक बदल केले. मोठमोठे डोंगर पोखरुन त्याठिकाणी सपाट रान तयार करुन त्यावर उंचउंच इमारती बांधल्या, नदी-तळ्यातील पाणी उपसले, त्या डोंगरावरील व पाण्यातील प्राणी सृष्टी नामशेष करण्यासाठी मानव हाच करणीतून असतो. अशी मानवाच्या सृष्टी विध्वंसाची यादी पाहिली तर त्याला सृष्टीचा कर्दणकाळ म्हटल्यास वावगे होणार नाही. मानाने प्रदूषणाची मालिका सुरु केली आहे.

प्रदूषणाच्या विळख्यात अख्या पृथ्वीला टाकून मानवाने स्वतःच स्वतःच्या मृत्यू ओढवून घेतला आहे. वेगवेगळी खनिजे पृथ्वीच्या पोटातून भरमसाठ स्वरुपात काढून घेवून त्याने संपूर्ण भूगर्भ पोखरुन काढले आहे. मोठ-मोठ्या फॅक्ट्रीज, कारखाने बसविले त्या माध्यमातून हवा व पाणी प्रदूषीत केले. आज एकूण संख्येचा विचार केला तर एक गोष्ट लक्षात येते की, मानवाने आपले सौख्य आपणस हिसकावून घेतले आहे. त्याने जैव साखळीचा ऱ्हास घडवून आणला. सुक्ष्मजीव जंतू मारले, किडे मुंग्या मारल्या ज्यामुळे उंदिर संपुष्टात आले. ज्यामुळे सापांची संख्या कमी झाली. ही जी प्राणी साखळी आहे ती संपवण्या मागे फक्त मानवाचाच हात आहे. या संदर्भात आपले विचार



T.C. Lecturer Shivaji College, Hingoli Tq.& Dist.Hingoli (M.S.)

SHIVAJI COLLEGE HINGOLI



मांडतांना मानवी कवी म्हणतात, "पर्यावरणातील समस्या म्हणजे पशू-संरक्षण पशूंची हत्या करणे नैतिकदृष्ट्या योग्य आहे का ? पशूंचा वध हा मांस भक्षणासाठी केला जातो. असे झाले तर पशुंची संख्या कमी होईल, हत्तीच्या दातांपासून हस्तीदंती वस्तू तयार केल्या जातात व त्या खूप मौल्यवान असतात, म्हणून हत्तीना मारुन टाकणे कितपत योग्य ? वाघाचे व्याघ्राजिन लोक बैठकीच्या खोलीत टांगून ठेवतात. म्हणून श्रीमंतीचे प्रदर्शन करण्यासाठी वाघांना मारणे योग्य आहे का ? मृगजिनासाठी हरणांना मारणे उचित ठरेल का ? अंदाधुंद शिकारीमुळे आज पक्षीसंख्या कमी होत चालली आहे. पशुंची हत्या केली तर पर्यावरणाचा समतोल बिघडले तसेच मानवाचे स्वास्थ्यही धोक्यात येईल."२ पर्यावरणाच्या ऱ्हासासाठी मानव कसा कारणीभूत आहे हे लेखकांनी चांगल्या पध्दतीने समजूवन सांगितले आहे.

"निसर्ग हा मानवाच्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. समतोल निसर्गचक्रावरच आपले अस्तित्व असल्याच्या जाणिवेचा मानवाला विसर पडत चालल्याने पर्यावरणाचा समतोल दिवसेंदिवस बिघडत चालल्याचा अनुभव जीवसृष्टी घेत आहे. जमीनीच्या पोटात शिरुन मानवाने अनेक खनिज, धातू शोधून काढले. कृत्रिम पाऊस पाडला, काही अंशी मानवाने निसर्गावर विजयही मिळवला, मात्र असे करतांना त्याने पर्यावरणाकडे दुर्लक्ष केल्याने पर्यावरण प्रदूषित झाले व आजही होत आहे. प्रदूषित पर्यावरणाचे गंभीर परिणाम मानव भोगत आहे. गरजांची पूर्तता व भौतिक सुख संपन्नतेसाठी निसर्गाला संकटात टाकून स्वत:ला सुशिक्षित समजणाऱ्या मानवाला आता भूतलावरील आपल्या अस्तित्वासाठी पर्यावरणाचे संरक्षण, संवर्धन करणे अनिवार्य ठरत आहे, निसर्गावर नानविध प्रयोग करतांना वर्तमानाशी जुळवून घेतांना त्याचे भविष्याकडे दुर्लक्ष होत आहे. "३

वर उल्लेखल्या प्रमाणे मानवाने स्वत:च्या स्वार्थासाठी पशु-पक्षी, वन्य जीव, खनिज संपत्ती, हवा, पाणी, जमीन, आकाश, माती, वातावरण सर्व काही प्रदूषित केले आहे. हे सर्व त्याने आपल्या हव्यासापोटी केले आहे. पण त्याला एक गोष्ट लक्षात ठेवणे गरजेचे आहे की, आपण जो पर्यावरणाचा ऱ्हास करतो आहोत तो पर्यायाने आपला म्हणजे मानवजातीसह प्राणी सृष्टीचाही ऱ्हास आहे. मानवाने हे ओळखले पाहिजे की, आपला घेण्याचा आणि देण्याचा हात एकच असला पाहिजे. पर्यावरण संरक्षण ही मानवाने आपली नैतिक जबाबदारी समजली पाहिजे. ज्याआर्थी तो या पृथ्वीतलावरील सर्वोच्च प्राणी आहे त्याआर्थी पर्यावरण संरक्षण ही त्याची नैतिक जबाबदारी आहे. निसर्गाकडून तो जे जे घेतो त्या प्रमाणात त्याला निसर्गाला काही देणे ही भाग पडते. त्याने ते दिले पाहिजे उदा. निसर्गातून मानव हवा घेतो किंवा प्राणवायु घेतो तेव्हा त्याने दरवर्षी एक झाड लावले पाहिजे. भौतिक सोई सुविधा मिळवण्यासाठी ज्या-ज्या प्रकारची साधन सामुग्री कच्चा माल म्हणून वापरली त्याची पुनर्निर्मीती करणे. हे सर्व करत असतांना जो मल किंवा टाकावू पदार्थ त्याद्वारे बाहेर पडतात त्याची योग्य प्रमाणात विल्हेवाट लावणे हे काम मानवाने कटाक्षाने पाळले पाहिजे. जेणे करुन पर्यावरणाची हानी होणार नाही.

आज मानवाने जी प्रगती केली आहे त्यामुळे त्याने प्रदूषणातही मोठ्या प्रमाणावर भर घातली आहे. मानवी वास्तव्यासाठी जंगल तोड करुन घरे बांधली पण त्या प्रमाणात नवीन झाडे लावली नाहीत. भौतिक सोई-सुविधांसाठी कच्चा माल वापरुन प्रक्रिया करुन वेगवेगळी उत्पादने बाजारात आणली पण फॅक्ट्रीज कारखाने यांच्या सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावली नाही. तसेच टाकावू पदार्थाची सुध्दा योग्य पध्दतीने विल्हेवाट लावली नाही. परिणामी पाणी प्रदूषण, हवा प्रदूषण, ओझोन वायुला छिद्रे पडणे, ऑक्सीजनचा पुरवठा कमी होणे, वेगवेगळे आजार उद्‌भवणे, उन्हाची प्रखरता वाढणे, पाऊस नसल्यामुळे पाणी कमी पडणे म्हणजेच वारंवार जणसामान्यांचा दुष्काळाला तोंड द्यावे लागणे. इत्यादी समस्यांना सामोरे जावे लागते. म्हणून मानवाने पर्यावरण प्रदूषण रोखण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

मानवाने आणु उर्जेचा शोध लावला. त्याचा सकारात्मक उपयोग करुन फायदा घेण्यासाठी तो शोध उपयुक्तच आहे. पण त्याचा वापर प्रमाणा बाहेर गेल्या नंतर पृथ्वी बेचीराग करण्यासाठी वेळ लागणार नाही. तसेच मानवाने कृत्रीम बुध्दीमत्ता तयार केली आहे. त्याचा वापर विधायक कार्यासाठी केल्यास ते वावगे नाही पण त्याचा वापर विनाशक कार्यसाठी केला असल्यास त्यामुळे मानवी अस्तित्व धोक्यात येत आहे. मानवाने जे अनेक शोध लावले आहेत. त्या मध्ये इलेक्ट्रॉनिक साधनांचा फार मोठा समावेश आहे. पण ते बनवतानांचे आणि बिघाड झाल्या नंतरच्या टाकावू पदार्थाचा म्हणजेच इ-कचऱ्याचा प्रश्न आज मानवाला भेडसावत आहे.

सारांश रुपाने असे म्हणता येईल की, आज मानव हा प्रगतीच्या, विकासाच्या अतीउच्च शिखरावर जाऊन पोहचला असला तरी पर्यावरणाचा समतोल राखने ही त्याची नैतिक जबाबदारी आहे हे विसरुन चालणार नाही. या सृष्टीच्या संगोपनाची नैतिक जबाबदारी त्यांच्यावर येते कारणे तो विवेकशील प्राणी



T.C. ... Hingoli ... Dist.Hingoli (MS.)

73

SHIVAJI COLLEGE HINGOLI



आहे. त्याने आपल्या सद्सद् विवेकबुध्दीचा वापर केला तरच तो इतर प्राण्यांच्या पासून वेगळा ठरु शकेल. अन्यथा नाही.

संदर्भ ग्रंथ:-

१) उपयोजि नीतिशास्त्र, लेखक डॉ. सुनिल साळुंके, मैत्री प्रकाशन लातूर, पृ. क्र. १०३.

२) उपयोजित नीतिशास्त्र, लेखक प्रा. माधवी कवी, विद्या प्रकाशन नागपूर, पृ. क्र. १००.

३) दैनिक पुण्यनगरी दि.२३.०२.२०१९

निष्कर्ष :-

१) मानवाने पर्यावरण संरक्षण, संवर्धन ही आपली नैतिक जवाबदारी समजली पाहिजे.

२) तहान लागण्या आधीच पाण्याची सोय करणे योग्य. पर्यावरण संवर्धन करणे म्हणजे स्वतःचे आणि सृष्टीचे अस्तित्व टिकविणे होय

□□□

T.C

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

14

# गांधीजींचे स्त्री उत्थानासंबंधी विचार आणि कार्य

डॉ. देवयानी चव्हाण
गो. से. अर्थ वाणिज्य महाविद्यालय नागपूर

**********

## सारांश

स्त्री व्यक्तिमत्त्वविकासाला संधी देणारे गांधी एक थोर समाजसुधारक होते. गांधींनी स्त्रीमुक्ती आणि स्त्रीशक्तीला सतत चालना आणि प्रेरणा दिली. स्त्री पुरूष तत्त्वतः समान आहेत. स्त्रीला स्वतःचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे. पुरूषांपेक्षा जास्त स्त्रीला मानसिक शक्तींची देणगी मिळालेली आहे. त्याग, सोशिकता, कष्टाळूपणा याबाबतीत ती पुरूषापेक्षा काकणभर श्रेष्ठच आहे. अहिंसेचे तत्व पाळण्यात तीच अधिक पुढे आहे. स्त्रीलाही पुरूषांइतकेच अधिकार असले पाहिजेत. स्त्री ही पुरूषाची मालकीची भोगवस्तू नाही. स्त्री मुळातच चंचल व पापाभिमुख आहेत. त्यांना पुरूषांपेक्षा संरक्षणाची अधिक गरज आहे. हे गांधींना मान्य नव्हते. कायद्याने पुरूषाला मिळणारे सर्व हक्क स्त्रीला मिळाले पाहिजेत, या हक्कांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारची तडजोड होता कामा नये. स्त्रीला मालमत्तेचा व शिक्षणाचा अधिकार पाहिजे.कुटुंबाच्या संपत्तीत तिला समान वारसा हक्क मिळाला पाहिजे. राजकीय चळवळीत पुरूषांच्या बरोबरीने भाग घेण्याची तिला संधी मिळाली पाहिजे. बहुसंख्या स्त्रियांच्या दृष्टीने विचार केला तर रूढीची बंधने नाहीशी करून स्त्रियांना विकासाची संधी उपलब्ध करून देणे हेच ख—या सुधारणेच्या चळवळीचे उदिष्ट असले पाहिजे. म्हणून त्यांनी जुन्या परंपरेच्या दास्यातून मुक्त करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. पुरूषांप्रमाणे स्त्रियांनाही आजन्म अविवाहित राहण्याची मोकळीक असली पाहिजे ह्या मताचा गांधीनी पुरस्कार केला. ज्यांना समाजसेवेत आपले आयुष्य व्यतीत करावयाचे असेल त्यांनी विवाहबंधनात न अडकणे



Scanned with OKEN Scanner